# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २३/०८/२००४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा सोमवार दिनांक २३/०८/२००४ रोजी सभा सुचना क्र. १५ दि. २१/०८/२००४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात दुपारी ०३.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. नितीन गोपीनाथ ठाकूर | सदस्य |
| ४) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |
| ५) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ६) | श्री. मिलन गोंविंदराव पाटील | सदस्य |
| ७) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ८) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ९) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| १०) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ११) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| १२) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| १३) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| २) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ३) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

**प्र. सचिव :-**

आजच्या सभेमध्ये नवीन उपायुक्त आलेले आहेत. त्यांची प्रथम ओळख करुन देतो.

**अजिज शेख (मा.उपआयुक्त साो.) :-**

मी अजिज शेख. मी यापुर्वी चिपळून नगरपालिकेत मुख्याधिकारी म्हणून कार्यरत होतो.

**मोहन पाटील :-**

आम्ही स्थायी समितीच्या सर्व सदस्यांच्यावतीने उपायुक्त अजिज शेख यांचे स्वागत करतो आणि नव्याने आयुक्त म्हणून आले. म्हणजेच पूर्वी प्रभारी आयुक्त होते. त्याच्यानंतर उपायुक्त होते. आता भिवंडीचे आयुक्त आणि मिरा भाईंदरचे ॲडिशनल चार्ज आपल्याला मिळाला. त्यामुळे सर्वांच्या वतीने आम्ही आपले हार्दिक स्वागत करतो.

**प्रभात पाटील :-**

आता सध्या आमच्या असलेल्या आयुक्तांच्या गैरहजेरीमध्ये जरी आलेले असाल तरी सगळ्यांच्या वतीने मी परमेश्वराकडे प्रार्थना करिन की, यापुढे आपण कायमस्वरुपी आयुक्त म्हणून या महापालिकेमध्ये यावे.

**अशोक पाटील :-**

आपल्या सेवेचा आम्हाला लाभ दयावा.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ९२ चे वाचन केले.)

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापतीसाहेब, प्रकरण क्र.९२ एक औषध खरेदी आहे आणि दुसरे कामगारांचा ठेका. हे दोन्ही एकच दिलेले आहे. हे कसे काय? दोन्ही विषय भिन्न भिन्न आहेत. एक औषधी खरेदीचे आहे आणि दुसरे आरोग्याविषयी हे दोन्ही एकच दिलेले आहे. आरोग्याविषयी असले तरी दोन्ही भिन्न भिन्न विषय आहेत. प्रकरण वेगवेगळे आहेत का?

**मा. सभापती :-**

निविदा मंजुर करायच्या आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

एकच विषय आरोग्याविषयी आहे ना.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आरोग्याविषयी असला तरी पण औषध खरेदी आणि कामगारांचा ठेका या दोन वेगवेगळया गोष्टी आहेत.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त सा़ो.) :-**

विषय असा आहे निविदांना मंजुरी देणेबाबत. जंतुनाशकाच्या पण निविदा आहे आणि साफसफाईच्या पण निविदा आहेत. त्यामुळे निविदांना मंजुरी देण्याचा विषय आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

निविदा जरी एक असली तरी विषय भिन्न भिन्न आहेत.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त सा़ो.) :-**

पण महासभेने जी प्रशासकीय मंजुरी दिली. त्याला अनुसरुनच हा विषय दिलेला आहे. महासभेने काय मंजुरी दिली की, वॉर्डवाईस साफसफाईचे टेन्डर काढावे. त्याचे एस्टिमेट मंजुर केले. महासभेच्या ठरावाला अनुसरुन हे टेन्डर निघाले. जर त्याला प्रशासकीय मंजुरी मिळाली असेल म्हणजेच जंतुनाशक आणि वॉर्डवाईस साफसफाईला मिळाली. महासभेने ठराव केल्यानंतर आम्ही टेन्डर काढले आणि आता जे टेन्डर आले ते निविदा मंजुरीसाठी जे महासभेने ठराव केले त्याचे ठेवलेले आहे.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतो, आरोग्याच्या निविदा म्हणजे जर याच्यामध्ये बांधकामाच्या निविदा असत्या किंवा अन्य कुठल्या निविदा असत्या तर आपल्याला त्याला वेगळा विषय क्रमांक देता आला असता. आरोग्याच्या संदर्भातील निविदांना मंजुरी देण्याचा विषय आहे. म्हणजे औषधे आणि जे प्रभाग साफसफाई आहे. हे दोन्ही आरोग्याच्या अखत्यारितील बाबी असल्या कारणाने आरोग्यांना निविदा मंजुरी देणे हा विषय आलेला आहे आणि त्याच्यामध्ये आपण भाग देउ शकतो. म्हणजे प्रकरण क्र.९२ मध्ये निविदा अर्थात औषधे किंवा प्रकरण क्र. ९२ मध्ये आरोग्याच्या निविदा देणे. सभापती महोदय, याच्यामध्ये फक्त एकच प्रकरण क्र. ९२, ९२(अ) करायला पाहिजे होते. हा संपूर्ण विषय बरोबर आहे.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, आता आयुक्त साहेबांनी जो खुलासा केला की, महासभेने ज्याला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. आर्थिक, प्रशासकीय मान्यतेसाठी तो खाजगीकरणामार्फत प्रभागनिहाय सार्वजनिक सफाई करणेबाबत. जो अजेन्डावर विषय होता. याच्यासाठी महासभेने आपल्या आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे आणि त्यानुसार या निविदा काढण्यात आलेल्या आहेत. त्या निविदा वेगळया असायला पाहिजेत. तो विषय वेगळा असायला पाहिजे आणि औषध खरेदीचा जो ठराव आहे. हा वेगळा आहे.

**मोहन पाटील :-**

म्हणूनच मी बोललो. प्रकरण क्र. ९२, ९२(अ) करा.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त सा़ो.) :-**

मा. सभापतीसाहेब, जो जंतुनाशक खरेदीचा विषय आहे. तो विषय दहा लाखाच्या आतील विषय आहे. मी प्रशासकीय, आर्थिक मंजुरी मी दिलेली आहे. म्हणजेच पूर्वी आयुक्तांनी दिलेली आहे आणि जे खरेदीचे टेन्डर निघाले आहे. ते टेन्डर दहा लाखाच्या आतील आहे. अवलोकनार्थ म्हणून

पाठविलेले आहे. ते अवलोकन करायचे आहे आणि ही एकच निविदा मंजुर करायची आहे. म्हणूनच प्रकरण ९२ आणि ९२ (अ) करु.

**जोजफ घोन्सालवीस :-**

हो तसे करा. पण प्रकरण ९२ ला आरोग्य विभागाच्या निविदांना मंजुरी देणे. असे करण्यापेक्षा अवलोकनार्थ असे करा.

**कैलासबेन जानी :-**

साहेब, मी सांगते की तुम्ही यंदा जी रक्कम इथे ठेवलेली आहे. पण किती लीटर मागवणार आहे. त्याचा पण अंदाज काढायला पाहिजे होता. त्याच्यामध्ये एवढे लीटर घेणार म्हणून मेन्शन करायला पाहिजे होते.

**अशोक पाटील :-**

जी प्रकरणे आयुक्त साहेबांकडून अवलोकनार्थ येतात. त्याचा त्याच्यामध्ये स्पष्ट उल्लेख असतो.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त साो.) :-**

यामध्ये काळे फिनाइल रु. ६८/- लीटर आहे आणि दर सर्वात कमीचे आलेले आहेत. दोन हजार लीटर खरेदी आहे आणि मागील दर रु. ४७/- आहे आणि चालू दरसुध्दा रु. ४६/- आहे. म्हणजे ह्या विषयी आयुक्तांनी कमी दराचे टेन्डर मंजुर केलेले आहे. तुमच्याकडे आलेला अवलोकनार्थ विषय आहे.

**मोहन पाटील :-**

याच्यामध्ये अवलोकनार्थ असा उल्लेख केलेला नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

अवलोकनार्थ असा उल्लेख करा.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त साो.) :-**

हा विषय घेतला नाही तरी पुढच्या सभेला अवलोकनार्थ येईल. सबजेक्टवर विषय येउन येईल. पण हे आयुक्तांच्या अधिकार कक्षातील आहे. शिंदेसाहेबांनी आर्थिक, प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. टेन्डर आल्यानंतर माझ्याकडे मंजुरीसाठी आले. कारण जंतुनाशके शिल्लक नाहीत असे म्हणायला लागले म्हणून मी केले.

**मोहन पाटील :-**

साहेब, आपण त्याचे इंम्प्लिमेंन्टेशन करा आणि पुढच्या वेळेला अवलोकनार्थ आणा. त्याने आपल्याला काहीही फरक पडणार नाही.

**मिलन पाटील :-**

अवलोकनार्थ आलेला प्रत्येक विषय हा पासच केला पाहिजे अशी काही जरुरी नाही. हा सभागृहाचा निर्णय आहे. प्रत्येक गोष्ट अवलोकनार्थ आली नाही पाहिजे. जर तुम्ही प्रत्येक गोष्ट अवलोकनार्थ पाठवून द्याल तर आमची स्थायी समितीची आवश्यकता काय? अवलोकनार्थ वर चर्चा होऊ दे. आम्हाला वाटले तर आम्ही तो पास करु.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेब, ज्या बाबी दहा लाखाच्या आतील असतात. त्याला आयुक्तांना अधिकार असतात. सचिव साहेब, त्यांनी जे प्रोसिडिंगमध्ये हे केले ते जरा मागे घ्या.

**मिलन पाटील :-**

दुसरे म्हणजे हा आरोग्याचा विषय आहे. आता आरोग्याचे मागचे हे झाले. तर आपले हे जे सॅनिटरी इन्स्पेक्टर आहे. त्यांचे काय म्हणणे आहे? की हे कसे काय झाले? आपण हया आता पुन्हा निविदा काढलेल्या आहेत. तर तुमचे काय म्हणणे आहे? की हे बरोबर झाले होते की आपण जे त्याच्यापूर्वी करत होते. त्याची बरोबर होती की खातेनिहायची बरोबर होती. त्यात तुमचा अहवाल काय आहे?

**मा. सभापती :-**

आता मी सभासदांना एक विनंती करतो की, आचारसंहिता २८ तारखेला लागत असताना आपल्याला औषध मागण्याची जरुरी असल्या कारणाने आपण हा मंजुर करावा अशी माझी विनंती आहे.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, अवलोकनार्थ विषय असतो. त्याला फरक पडत नाही.

**मिलन पाटील :-**

सभापती साहेब, त्याच्यावर चर्चा झाली पाहिजे. चर्चा झाल्यानंतर आपल्याला पासच करायचा आहे.

**अशोक पाटील :-**

हे निविदा मागवून औषध आणल्यानंतर आपल्यासमोर अवलोकनार्थ आणतात.

**मोहन पाटील :-**

तसा विषय नाही. पहिला जो आहे तो विषय अवलोकनार्थ आणायचा आहे. म्हणून आपण तो विषय आता घेत नाही आणि त्याचे इम्प्लिमेन्टेशन सुरु झाले. कमिशनरांच्या अखत्यारित असलेली ती बाब आहे. ते काम कधीही करु शकतात आणि पंधरा दिवसाच्या आत सादर करायचा असतो.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त सो.) :-**

पंधरा दिवसाच्या आतमध्ये तुम्हाला सादर करायचे आहे. त्यावेळेला तुम्हाला सविस्तर गोषवारा मिळेल.

**मोहन पाटील :-**

दुसरी गोष्ट म्हणजे जी आवश्यक बाब असेल त्याला आपल्याला अखत्यारीचा प्रश्न येणार नाही.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त सो.) :-**

आता सन्मा. सदस्य पाटील साहेब, यांनी जो प्रश्न विचारला. तो महासभेमध्ये जी मंजुरी मिळाली. म्हणजे वॉर्डवाईज साफसफाई करायची की नाही करायची हे ठरविण्यासाठी महासभेपुढे विषय आला होता. त्याला आर्थिक व प्रशासकीय मंजुरी याचा असा अर्थ होतो की हे काम घ्यायचे की नाही घ्यायचे. त्यावेळेला सर्व गोष्टींचा उलगडा व्हायला पाहिजे. टेन्डर मंजुरी करताना हे खातेनिहाय करायचे की काय करायचे हा प्रश्न आता उपस्थित होत नाही.

**मिलन पाटील :-**

साहेब, माझा प्रश्न तुम्ही समजलात नाही. मी सॅनेटरी इन्स्पेक्टरला विचारले की, जी त्यावेळेची परिस्थिती होती. ती आता कशी आहे? किंवा माझा प्रश्न तुम्ही समजून घ्या की, जी गेल्या वर्षी साफसफाई झाली. त्याचा मी अभिप्राय मागितला. आम्ही त्यांच्या अभिप्रायावर बोलायचे आहे. त्यांचा काय अभिप्राय आहे. ते आम्हाला बघु दे. दोन सॅनेटरी इन्स्पेक्टर नेमलेले आहेत. तर तुमचा काय अभिप्राय आहे?

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त सो.) :-**

ठराव क्र. ३० विषय क्र. २७ खाजगीकरणामार्फत प्रभागनिहाय सार्वजनिक साफसफाई करण्याबाबत मिरा भाईंदर महानगरपालिकेचे ७९ चौ. किलोमीटर शहर असून शहराची लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार ५ लाख २० हजार आहे आणि २६० टन कचरा निघतो. त्यामध्ये सन्मा. सदस्य आसिफ शेख आणि सन्मा. सदस्य शशिकांत शाह ठराव सर्वानुमते मंजुर. एस्टिमेट ३ कोटी ४८ लाख ८४ हजार ३९३ चे मंजुर केलेले आहे. आपण जो प्रश्न विचारला. हा डिटेलमध्ये ठराव केलेला आहे आणि आर्थिक व प्रशासकीय मंजुरी सदर रकमेला दिलेली आहे.

**मिलन पाटील :-**

माझा तो प्रश्न नाही. ठराव पास झालेला आहे. आम्ही त्या ठरावाच्या बाजूने आहे. आम्हाला त्यांचा अभिप्राय पाहिजे. मला त्यांना विचारु दे की, त्यांचा अभिप्राय शहराची साफसफाई व्यवस्थित होते की नाही आणि आम्हाला त्यांनी सांगावे शहराची साफसफाई व्यवस्थित होते की नाही? मग आम्ही त्याच्यावर प्रश्न विचारतो.

**संदिप शिंदे :-**

शहरातील साफसफाई व्यवस्थित होते.

**मिलन पाटील :-**

तुमच्याकडे काय पुरावा आहे की, शहराची साफसफाई व्यवस्थित होते. माझ्या तुमच्याकडे किती तक्रारी आहेत. तुमचे सॅनेटरी इन्स्पेक्टर आहेत. ते काय करतात? प्रत्येक ठिकाणी जातात का? तुम्ही साईडवर किती वेळा गेलात.

**संदिप शिंदे :-**

तुमची तक्रार ज्या ज्यावेळेला आली. त्या त्यावेळेला जाउन आम्ही पाहणी करतो.

**मिलन पाटील :-**

आम्ही तक्रार केल्यानंतरच तुम्ही जाता. तुम्हाला काम बघायचे नाही का? आम्ही प्रत्येक वेळेला वॉचमनगिरी करायची आणि आम्ही त्याच्यावर चर्चा करायची का? तुम्ही प्रत्यक्ष किती वेळा

गेलात? आणि तुम्ही याच्यातील प्रत्यक्ष काय पकडले आहे? ते तुम्ही आम्हाला सांगा की, आम्ही अमुक माणसे काम करताना पकडलेली आहेत. तुम्ही कुणाला काही रिपोर्ट दिलेला आहे का? तुमचे किती रिपोर्ट गेलेले आहेत.

**संदिप शिंदे :-**

कनेक्टिव्हीटीबाबत पाहणी करुनच बांधकाम विभागाला अर्ज सादर केलेले आहेत.

**मिलन पाटील :-**

आता आपल्या टेन्डरप्रमाणे जिथे दहा माणसे लागायला पाहिजेत. तिथे दहा माणसे लागलेली नाहीत. पाच माणसे लागलेली आहेत. असा तुम्ही नगरपालिकेला कधी अभिप्राय दिलेला आहे का?

**संदिप शिंदे :-**

एस.आय.ला आम्ही माणसांवर लक्ष ठेवायला सांगतो.

**मिलन पाटील :-**

सांगतो नाही. तुम्ही अभिप्राय दिले आहेत का?

**संदिप शिंदे :-**

हो. अभिप्राय दिलेले आहेत.

**मिलन पाटील :-**

किती अभिप्राय आहेत? ते तुम्ही दाखवा. तुमचे लेखी रिपोर्ट आहेत का?

**संदिप शिंदे :-**

लेखी रिपोर्ट तसे नाही आहेत. पण तोंडी सांगतो.

**मिलन पाटील :-**

वर्षामध्ये एकही तुमचा लेखी रिपोर्ट नाही का? कुठेही तुम्हाला कमी माणसे दिसली नाहीत.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त सो.) :-**

आरोग्य अधिकाऱ्याकडून प्रत्येक सॅनेटरी इन्स्पेक्टरला लेखी रिपोर्ट दया.

**मिलन पाटील :-**

तुमचे सॅनेटरी इन्स्पेक्टर फिरतात. तर तुम्हाला वर्षभरामध्ये दोन किंवा चार माणसे कमी आहेत असे मिळाले नाही का? फावडे कमी आहे की घमेल कमी आहे. कुठेच तुम्हाला मिळाले नाही का? तुमचा रिपोर्ट काय बोलतो. ते तुम्ही सांगा. तुम्ही कायदयामध्ये रिपोर्ट दिलेला आहे का?

**नितीन ठाकुर :-**

साहेब, आमच्या रेकॉर्डला घ्यायला पाहिजे का? वॉर्डमध्ये किती मजुर आले? तुमच्याकडे रेकॉर्ड असायला पाहिजे की नको.

**मिलन पाटील :-**

ॲज पर ॲग्रीमेन्ट पाहिजे. तुम्ही घ्यायला पाहिजे की नाही. हे ऑफिसमध्ये ए.सी.मध्ये बसलेले असतात. यांना फिरायची काय जरुरी आहे. यांना शहराच्या साफसफाईचे काय? हे ठाण्यावरुन साडे नउ, दहा, अकरा वाजता येतात. त्यांना साफसफाई बघण्याची आवश्यकता काय आहे? साफसफाई करायला तर नगरसेवक बसलेले आहेत.

**नितीन ठाकुर :-**

साहेब, आता गेल्यावर्षी टेन्डर होउन गेलेले आहे. किती मजुर कामावर आले आणि किती आले नाहीत. याचा रिपोर्ट त्यांनी दयायला पाहिजे आणि तो रिपोर्ट त्यांनी दिलेला नाही. त्यांच्यावर कारवाई काय करायला पाहिजे.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त सो.):-**

हजेरी घ्यायला पाहिजे. मटेरियल आहे की नाही ते बघायला पाहिजे.

**मिलन पाटील :-**

त्या दोघांनीदेखील वर्षभरामध्ये रिपोर्ट दिलेले नाही. त्यांनी किती रिपोर्ट सादर केलेले आहेत ते दाखवा.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त सो.) :-**

याचा अर्थ पण असा होत नाही की, जर अजिबात साफसफाई झाली नसती तर प्रत्येक वॉर्डमध्ये कचऱ्याचे ढिग लागले असते. गटारे तुंबली असती. म्हणजे जर त्यांची चुक होत असेल तर आपण त्यांना लेखी देउ. पण अजिबातच साफसफाई काही होत नाही असे म्हटले तर वर्षभर काम झाले नसते आणि रस्त्यावरदेखील कचऱ्याचा ढिग राहिला असता.

**मिलन पाटील :-**

अजिबातच साफसफाई होत नाही असे आमची म्हणणे नाही आणि आमचा आक्षेपही नाही. परंतु, त्या लोकांनी तिथे फिरल्यानंतर कुठे त्यांना मिळेल की नाही. रणखांबसाहेब, तुम्ही परवा बोललात की, गोराई साईडला आपल्या शहराचे मिनिस्टर लोकदेखील जातात. तर मी बोललो गोराईला आपण कचरा टाकतो. त्याच्यानंतर सांगितल्यावर त्यांनी साफ केलेले आहे. तुम्ही आता चला तुम्हाला दाखवतो. आज पण कचरा पडलेला आहे. परवाच्या दिवशी गाडी खाली होता पकडलेली आहे. मग त्यांचे काय काम आहे? परवाच्या दिवशी पण हयांनी सांगितले होते.

**शिवमूर्ती नाईक (मा.आयुक्त सो.) :-**

त्यांच्याकडून ते ठेकेदाराकडून काम व्यवस्थित होत नाही. त्यांना प्रत्येक वेळेला हजेरीमध्ये कमी माणसे आढळली किंवा व्यवस्थित साफसफाई झाली नाही असे आपण त्याचे एकूण रु. दोन लाखाचे बिल कपात केलेले आहे. ज्या ज्या विभागामध्ये असे घडले त्या त्या विभागात बिल कपात केलेले आहे आणि ज्या ज्या विभागातून तक्रारी येतात. त्याचे साफसफाईचे निरसन संध्याकाळपर्यंत किंवा दुस-या दिवशी सकाळपर्यंत केले जाते.

**मिलन पाटील :-**

मी परवाच्या दिवशीदेखील दोन वेगळया रस्त्यावर गाडी खाली होताना बघितलेली आहे. साहेबांनी मागच्या सभेत सांगितले होते. पण परवाच्या दिवशी पण झालेले आहे. प्रश्न तो नाही. मागच्या वेळेला मी एक डिझेलचे चोरीचे प्रकरण दिले होते. आपले डिझेल रु. १८/- ने विकले जाते अशी मी लेखी तक्रार दिली होती. मला थातुरमातुर उत्तर देउन नुसते गप्प केलेले आहे. मला कोणाच्या पोटावर पाय दयायचा नाही. पण हया ज्या गोष्टी होतात. त्याला सॅनेटरी इन्स्पेक्टर जबाबदार आहेत. त्यांचा त्याच्यावर अजिबात वचक नाही. जे मुकादम असतात. कॉन्ट्रक्टर असतात. सॅनेटरी इन्स्पेक्टरचा त्याच्यावर धाक असतो की नाही. तर हयांची जबाबदारी काय?

**मा. सभापती :-**

आपण त्या संदर्भात प्रशासनाकडे तक्रार करु.

**मिलन पाटील :-**

जर एका वॉर्डमधील नगरसेवकाच्या पाच तक्रारी आल्या. तर त्या सॅनेटरी इन्स्पेक्टरवर कारवाई करायची असा मी ठराव मांडतो.

**नितीन ठाकुर :-**

माझे या ठरावाला अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

आपण डिझेलच्या विक्रीवर चौकशी करुन तुम्हांला नंतर कळवू.

**कैलासबेन जानी :-**

सभापतीसाहेब, आमच्या एरियामध्ये व्यवस्थित साफसफाई होते. जेव्हा जेव्हा आम्ही फोन करतो. तेव्हा तेव्हा त्यांची माणसे येउन साफसफाई केलेलीच आहे. पण तरीसुध्दा कुठेतरी राहिलेले असेल जसे सन्मा. सदस्य मिलन पाटीलसाहेब सांगतात तसे झालेले असेल तर त्यांनी लक्ष देउन साफसफाई करायला पाहिजे. माझ्या हिशेबाने आमच्या एरियामध्ये साफसफाई व्यवस्थित होते असे माझे मत आहे आणि जेव्हा कच-याचा ढिग पडलेला असतो. मी फोन केल्यानंतर त्यांची माणसे येतात आणि साफसफाई करतात असा मला अनुभव आहे.

**मा. सभापती :-**

गेल्या सभेला सर्व सभासदांना मी सांगितलेले आहे की, सर्व नगरसेवकांच्या सहया घेउन यायच्या. आपापल्या वॉर्डमधील सर्व नगरसेवकांना सांगितले आहे की, जो कॉन्ट्रक्टर असेल तर तेथील माणसे साफसफाई करत असतील त्याची सही घेउनच आपला वॉर्ड स्वच्छ आहे की नाही ते पहावे.

**मिलन पाटील :-**

छापील नगरसेवकांचे त्याला एक पत्रच ठेउन दयायचे. दर हप्त्याला त्याने त्याची साईन घ्यायची. कारण आपल्याला महिन्याची आठवणच राहणार नाही. दर हप्त्याला ही जबाबदारी मुकादमची राहणार आहे. कॉन्ट्रॅक्टरची जबाबदारी राहणार नाही. कॉन्ट्रक्टरची जबाबदारी नाही असा मी ठराव करतो. सॅनेटरी इन्स्पेक्टरची जबाबदारी आहे.

**मा. सभापती :-**

गेल्या सभेला आम्ही तुम्हाला सांगितले की, सर्व नगरसेवकांची साईन घेउन या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आता आयुक्त साहेबांनी सांगितले की, दोन लाख रुपये याच्यातून कपात केले.

**मा. सभापती :-**

सहा लाख दंड गेल्या वर्षाच्या हयातून वसुल केलेला आहे.

**जोजफ घोन्सावीस :-**

तो कुठल्या वॉर्डवाईज कसा कसा केला. त्याचा आम्हाला तपशील मिळेल का? जरा तपशील दया.

**शिवमूर्ती नाईक(मा.आयुक्त साो.) :-**

त्या त्या वॉर्डामधील कौन्सिलरची साफसफाईबददल ज्या काही तक्रारी असतील तर सॅनेटरी इन्स्पेक्टरने दिवसातून एकदा भेटून यावे.

**मिलन पाटील :-**

दर हप्त्याला पत्र देउन सही घ्यायची.

**शिवमूर्ती नाईक(मा.आयुक्त साो.) :-**

त्यांना आदेश दया. सॅनेटरी इन्स्पेक्टरना आदेश दया. सॅनेटरी इन्स्पेक्टर नसतील तर मुकादमांना भेटायला सांगा.

**कैलासबेन जानी :-**

पहिले जे बुक ठेवत होते. जे मुकादम असतील ते पूर्वी नगरसेवकांच्या घरी जाउन सही घेत होते. तसे एक बुक ठेवा. सगळया नगरसेवकांकडे जाउन त्यांना सही करुन द्यायला पाहिजे.

**शिवमूर्ती नाईक (मा.आयुक्त साो.) :-**

मुकादमला द्यायला सांगा. सॅनेटरी इन्स्पेक्ट चार जणांकडे जातील. मुकादम चार जणांकडे जातील.

**जोजफ घोन्सालवीस :-**

कॉन्ट्रॅक्टरच्या ह्याच्यात सफाई कामगारांनादेखील किती पगार देतात?

**अशोक पाटील :-**

आता आपण जो महासभेसमोर ठराव केलेला आहे. तर आपण किती ठरवले?

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त साो.) :-**

आपल्या एस्टिमेटमध्ये १२५ रु. ३३ पैसे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

कॉन्ट्रॅक्टर त्यांना किती देतो?

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त साो.) :-**

त्याच्याशी आपला काही संबंध नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

त्यांना फक्त साठ रुपये मिळतात.

**शिवमूर्ती नाईक (मा.आयुक्त साो.) :-**

आपण खाणीतून दगड मागितला. दगड देण्याचे काम केले. त्यांनी कितीला खरेदी केले? हे विचारण्याचे आपल्याला काहीही कारण नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पण त्यांना कमी पगार मिळतो की नाही? साफसफाई त्याच पद्धतीने होणार काय?

**शिवमूर्ती नाईक (मा.आयुक्त साो.) :-**

आपला काहीही संबंध नाही.

**रिटा शहा :-**

मला जिथपर्यंत माहिती आहे. तिथपर्यंत कमिशनर शिंदेसाहेबांनी त्या कॉन्ट्रॅक्टरला लेखी दिलेले आहे की, रु. १२५/- पर लेबरला दयायचे असे काहीतरी त्याच्यामध्ये ठरलेले आहे. मागच्या महासभेमध्ये हा विषय आला होता. मीच विचारले होते की, त्यांना रु. १२५/- मिळतात की नाही ते कोण बघणार?

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण त्यांना रु. १२५/- कोणत्या बेसीसवर देता?

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, ज्या ठिकाणी चौदा प्रभाग पाडलेले आहेत. या चौदा प्रभागामध्ये एकंदरीत ११४७ कामगार आणि एकूण ३६ वाहने अशा पध्दतीने एकूण प्रभागवाईस साफसफाईचे नवीन टेन्डर काढलेले आहे. त्याच्यामध्ये आपण नक्की काय अटी-शर्ती मान्य केलेल्या आहेत? किंवा आपण ठेकेदारांमार्फत काय करुन देणार आहोत. त्याच्यामध्ये काय काय कन्डीशन्स असणार आहेत?

**मा. सभापती :-**

आपण सांगावे की त्यांच्याकडे सर्व साहित्य आहेत की नाही. आपण गेल्या सभेतच सांगितलेले आहे ते तपासूनच आपण ॲग्रीमेन्ट करावे.

**अशोक पाटील :-**

डिटेलमध्ये सांगा.

**शिवमूर्ती नाईक (मा.आयुक्त सो.) :-**

मिनिमम वेजेस ॲक्टप्रमाणे १२५ रु. ३३ पैसे दयायला पाहिजे. हे आपल्यावर बंधनकारक आहे. त्यांनी ते किती दयावे? हे कामगार आयुक्तांनी तपासावे. पण आपण किती देतो? हे एवढेच आपले म्हणणे आहे की मागच्या वर्षी आपण एस्टिमेटला रु. ८० धरले होते. त्यामुळे बिलो रेट आले. रेट बिलो आल्यानंतर त्यांचा धंदा सुरु झाला आणि त्यावर आदेश काही कमिशनरसाहेबांनी दिलेले नाहीत. मिनिमम वेजेस ॲक्टचे पालन करुन कारवाई करावी असे सुचित केले आणि आपण आता जो महासभेपुढे ठराव मंजुर केला. त्यामध्ये रु. ८० कामगाराचा रेट न धरता मिनिमम वेजेस ॲक्टप्रमाणे कामगार आयुक्तांचे जे बंधन आहे. ते १२५ रु. ३३ पैसे धरुनच टेन्डर काढावे असा महासभेचा ठराव झाल्यामुळे ते समाविष्ट करुन ते एस्टिमेट केले आणि मगच टेन्डर काढले. आपल्याला मिनिमम वेजेस ॲक्टप्रमाणेच पेमेन्ट करावे लागेल. पण कॉन्ट्रक्टर त्यांना किती पेमेन्ट करतात? हे पाहण्याचे काम महापालिकेचे नाही. फक्त एक सजेशन म्हणूनच आयुक्तांनी सुचित केलेले आहे. तुम्ही कामगार आयुक्तांकडे तक्रार करु शकता. कारण त्याचे तिकडे रजिस्ट्रेशन आहे की, मिनिमम वेजेस ॲक्टप्रमाणे पेमेन्ट केले की नाही केले. ते कामगार आयुक्तांनी बघायचे आहे. तिथे महापालिका हस्तक्षेप करु शकत नाही.

**मोहन पाटील :-**

साहेब, मध्यंतरी या विषयी आपले जे चतुर्थ श्रेणीतील कामगार आहेत. त्यांनी स्ट्राइकच्या पध्दतीने आयुक्तसाहेबांना नोटिस दिलेली होती आणि ती नोटिस दिल्यानंतर त्यांनी त्या संदर्भात असे एक पत्र दिलेले आहे की, यापुढे मिनिमम वेजेसप्रमाणेच त्या कामगारांना पगार दिला जाईल. आपण ज्या पध्दतीने आम्हाला सांगितले की, कामगार आयुक्तांनी विचार करावा. त्यांनी पहावे. त्यांचा तो लुकआउट आहे. आपल्या माहितीशी आम्ही सहमत आहोत. परंतु, जर उदया त्यांनी स्ट्राइक केल्यानंतर या शहरामध्ये ऐन दिवाळी, गणपती, नवरात्रीच्यावेळेला आपले सण जे येतात. या सणाच्या वेळेला जर त्यांनी स्ट्राइक केला आणि स्ट्राइक केल्यानंतर त्यांना मिनिमम वेजेसचा पगार मिळाला नाही. कारण महासभेमध्ये ही चर्चा झालेली आहे आणि महासभेमध्येसुध्दा त्यावर आधारितच आपण ही एस्टिमेट काउन्ट केली. कारण तुम्ही जसे सांगितले की, पूर्वी रु. ८० प्रमाणे काउन्ट केले होते आणि त्यांना पगार रु. ६० किंवा रु. ५० किंवा रु. ४० मिळत होता. तेव्हा त्यांनी अनेक वेळेला स्ट्राइक केले होते. मग त्यावेळेलासुध्दा त्यांना असा पगार वाढविला आणि जेव्हा कामगार आयुक्तांच्या निर्देशाखाली किंवा त्यांच्या कायदयाप्रमाणे त्यांना मिनिमम वेजेस दिलाच पाहिजे असे कंम्पलशन आहे. म्हणून आपण जे एस्टिमेट पकडताना कारण मागच्या वेळेच्या एस्टिमेटपेक्षा वर आहेत. मागे आपण तीन-चार कोटीने कमी होतो. दरवर्षीप्रमाणे तीन कोटी वर आहोत. आपल्या सभागृहाने आणि प्रशासनाने असे धरले की, आपण त्यांना कम्प्लसरी मिनिमम वेजेस दिले पाहिजे आणि म्हणून आपण त्यांची टेन्डरशिप वाढविली आणि साहित्याशी आधारभून घेतलेला आहे. त्यांनी ऐनवेळेला स्ट्राइक केला की, आम्हाला मिनिमम वेजेसप्रमाणे मिळायला पाहिजे. म्हणून आम्ही आमच्या परिनेसुध्दा प्रशासनाच्या वतीने त्यांना सांगितले की, तुम्हाला मिनिमम वेजेस दिला जाईल. म्हणून कमिशनर साहेबांनी कामगारांच्या संघटनेला पत्र दिले की, तुम्हाला रु. १२५/- पगार याच्यापुढे दिला जाईल असे पत्र दिलेले आहे. त्याची माहिती आपल्या प्रशासनाला आहे की, नाही ते कृपया बघावे आणि जर समजा याच्यामध्ये स्ट्राइक झाला तर आपण सांगितले की ते कामगार आयुक्तांनी बघावे. स्ट्राइक झाल्यानंतर ती झळ डायरेक्ट पालिकेमार्फत नागरिकांना पोहोचणार आहे. म्हणून जर आपण त्या पध्दतीने एस्टिमेट वाढविलेले आहेत. आपण त्यांना एस्टिमेटप्रमाणे पगार दिला पाहिजे अशा पध्दतीने आपण ॲग्रीमेन्ट करताना विचार करावा आणि विचार केला पाहिजे. साहेब, नाहीतर आपल्याला असे करुन म्हणजेच

हात वर करुन आपल्याला चालणार नाही. ते कामगार आयुक्तांचे आहे. हे जे युनियन क्षेत्र आहे. ते कधी कधी बरोबर वेळ साधतात. दिवाळी आली, गणपती आले, नवरात्र आली ऐनवेळेला सणाला स्ट्राइक सुरु करतात आणि त्या स्ट्राइकची डायरेक्ट झळ नगरसेवक आणि नागरिकांना पोहोचते. म्हणून तुम्ही ते कम्पलसरी करा. कारण ॲग्रीमेन्ट करण आपल्या हातामध्ये आहे. आपण ही निविदा मंजुर झाल्यानंतर ॲग्रीमेन्ट देणार आहोत. म्हणून आपण त्या पध्दतीने गाईडलाईन्स दयायला पाहिजे.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त साो.) :-**

यामध्ये जे कंपनीचे परमनन्ट कामगार आहेत. जे पगारवाढ दया आणि बोनस दया. म्हणून संपावर जातात. तेव्हा कंपनीला डायरेक्ट झळ पोहोचते. आता कंपनीवाले ठेका पध्दतीने कामगार घ्यायचे सुरु केले. ते कधीही संपावर गेले नाहीत. संपावर गेले तर ठेकेदार जबाबदार आहे. महापालिका जबाबदार राहणार नाही. आता ॲग्रीमेन्ट करताना असा क्लॉज टाकता येईल. ते आपले कर्मचारी नाहीत. त्यामुळे ठेकेदाराने आपले काम करुन दयायचे. जर लोक संपावर गेली तर दुसरे कामगार लावून त्याने साफसफाई करुन देण्याचे त्याच्यावर बंधन आहे. ठेका पध्दतीने घेतलेल्या कामगारांची काळजी, महापालिकेने जबाबदारी घेणे संयुक्तिक नाही. कारण कंपनीमध्ये आता सध्या कॉन्ट्रक्ट बेसीसवर कामगार घेतात. वास्तविक कॉन्ट्रॅक्टरवर रजिस्ट्रेशन करताना बंधन कामगार आयुक्तांचे आहे. आपण आता ते बंधन घालूनच ते पेमेन्ट करायला पाहिजे. असे जर आपण करायला लागलो तर आपले ज्याच्याशी अधिकार पोहोचत नाही. त्यांच्याशी करार केल्यासारखे होईल. त्या ठेकेदाराने दयावे हे बरोबर आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, कायदेशीर आहे. ते ॲग्रीमेन्टमध्ये घ्यायला पाहिजे ना.

**शिवमूर्ती नाईक (मा.आयुक्त साो.) :-**

माझ्या टेन्युअरमध्ये आलेले नाही. माझ्यासमोर पण आलेली नाहीत आणि मी ते स्विकारणार पण नाही.

**मोहन पाटील :-**

स्विकारण्याचे बोलत नाही. तक्रारीचे बोलत आहे.

**शिवमूर्ती नाईक (मा.आयुक्त साो.) :-**

तक्रार जरी आली तरी ते ठेकेदाराचे कामगार आहेत. महापालिकेचे कामगार नाहीत. त्यानंतर जर संप झाला तर त्यांनी वेगळे कामगार आणून साफसफाई करुन दयायची.

**अशोक पाटील :-**

सभापतीमहोदय, आता ज्या ठेकेदाराने आपल्याकडे निविदा भरलेल्या आहेत. त्यापैकी किती ठेकेदारांचे कामगार आयुक्तांकडे रजिस्ट्रेशन आहे. जर तपासा अंती काही ठेकेदारांकडे नसेल तर आपण त्यांना काय पनिशमेन्ट कराल? त्याचा ठेका रद्‌द करणार का?

**मा. सभापती :-**

त्या लोकांना बघुनच त्यांना हे केले जाईल.

**अशोक पाटील :-**

माझे असे म्हणणे आहे की, ठेका रद्‌द केला जाईल का?

**मा. सभापती :-**

त्याचे डिपॉझीट जप्त केले जाईल. ठेका रद्द केला जाईल.

**अशोक पाटील :-**

आपण ही निविदा काढली. आपण इथे साफसफाई करणार आहात. याच्यामध्ये आपण काय काय पुरवठा करणार? जसे कामगार, वाहने वगैरे. कशा कशा पध्दतीने साफसफाई केली जाणार आहे. जरा आरोग्य खात्याने याची सविस्तर माहिती सभागृहाला दयावी.

**प्रभात पाटील :-**

हा विषय आणताना सविस्तर टिपणी दिली असती की आपण याच्यामध्ये त्यांच्या काय सेवा शर्ती घातलेल्या आहेत. तुमची काहीतरी नोटिफिकेशन जाहिर केलेली असेल की नाही. ती नोटिस तरी त्याला ॲटॅच केली असती की, काय पध्दतीने त्यांनी काम केले पाहिजे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्या प्रभात पाटील, एवढे वर्ष आपले काम ठेकेदाराप्रमाणे चालेले आहे. त्याचप्रमाणे होणार आहे.

**अशोक पाटील :-**

दोन वर्ष झाली. ही प्रथा आपण सुरु केलेली आहे.

**शिवमूर्ती नाईक (मा.आयुक्त साो.) :-**

औषध खरेदी करताना फवारणी कशी करणार?

**प्रभात पाटील :-**

औषधाचा विषय नाही आहे. साफसफाईचा विषय आहे.

**मा. सभापती :-**

एवढे वर्ष साफसफाई होत आलेली आहे. त्याप्रमाणे साफसफाई होणार आहे.

**मोहन पाटील :-**

प्रभाग साफसफाईचा विषय चाललेला आहे. औषधांचा विषय नाही आहे.

**शिवमूर्ती नाईक (मा.आयुक्त साो.) :-**

कामगार आल्यानंतर काम कसे करणार हे प्रशासनाचे काम आहे.

**प्रभात पाटील :-**

काम होत नाही. म्हणून ही चर्चा चालू आहे.

**शिवमूर्ती नाईक (मा.आयुक्त साो.) :-**

साफसफाई व्यवस्थित होत नसेल म्हणूनच आम्ही काय केले की, गट क्र. १ ला रु. १२,०००/- दंड, गट क्र. २ ला रु. २२,०००/- दंड, गट क्र. ३ ला रु. ४,०००/- दंड, गट क्र. ४ ला रु. ४६,०००/- दंड, गट क्र. ५ ला रु. २२,०००/- दंड, गट क्र. ६ ला रु. १८,०००/- दंड, गट क्र. ७ ला रु. २२,०००/- दंड, गट क्र. ८ ला रु. ४४,०००/- दंड, गट क्र. ९ ला रु. १२,०००/- दंड, गट क्र. १० ला रु. २५,०००/- दंड, गट क्र. १०(अ) ला रु. ३२,०००/- दंड असे दंड करुन रु. २,७१,३७५/- जिथे ठेकेदाराने जे काम सांगितले होते ते केले नाही. म्हणून त्याला दंड केला आणि वसुल केला.

**मिलन पाटील :-**

टेन्डर किती लाखाचे किंवा करोडचे होते. हे नॉमीनल दंड साधकबाधक असते.

**प्रभात पाटील :-**

मी तेच सांगते. या विषयाची माहिती दयायला पाहिजे की नाही.

**शिवमूर्ती नाईक (मा.आयुक्त साो.) :-**

मागच्या सभेत हा विषय चर्चेला आला होता की, ठेकेदार व्यवस्थित साफसफाई करतो की नाही.

**मिलन पाटील :-**

मी काय सांगितले. हा दंड नसतो. हे ठेकेदाराचे चामडी वाचवण्याचे काम असते. ते आम्ही समजू शकतो. जर दोन करोडचे टेन्डर असेल तर बारा हजार दिले.

**शिवमूर्ती नाईक (मा.आयुक्त साो.) :-**

असे करु या की, ठेका पध्दतीने न करता डिपार्टमेन्टली काम करावे असा ठराव करा. म्हणजे प्रश्न मिटतो. आपले स्वतःचे प्रभाग किती आहेत? ॲक्चुली काम करणारे टोटल किती आहेत?

**राजकुमार कांबळे :-**

आपले कामगार २२८ आहेत.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त साो.) :-**

डिपार्टमेन्टली दहा-दहा कामगार वॉर्डवाईस घेउन साफसफाई करा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, साहित्य आपण देतो ना.

**गजानन भोईर :-**

मागच्या सभेत एक विषय काढला होता. एका ठेकेदाराविरुद्ध तक्रार केली होती की, त्याचे ब्लॅकलिस्टमध्ये नांव टाका. दुस-या प्रभागात त्यांना शिफ्ट केले कारण साफसफाई करीत नाही. म्हणुन त्याला ब्लॅकलिस्टमध्ये टाका असे सांगितले होते. पण त्यांना टेन्डर दिले आहे असे वाटते.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, कामगारांना साहित्य कोण देतो? आपणच म्हणजे नगरपालिका देते की ठेकेदार देतो.

**प्रभात पाटील :-**

आम्ही ज्याला नाही म्हणालो त्याला साहित्य मिळाले नाही.

**मिलन पाटील :-**

आयुक्त साहेब, हा कचऱ्याचा विषय आहे. आतापर्यंत तुम्ही त्याला पंखाखाली घातलेले आहे. आता त्यांना उब देऊन देऊन सवय झालेली आहे. म्हणुन नाईक साहेब आल्यानंतर ते समजतात. आपल्याला उत्तर देण्याची काहीही जरुरी नाही. तुमची थोडी कारवाई होऊ दे. अजुनपर्यंत त्यांना उब देऊन त्यांचे मनोधैर्य वाढलेले आहे. कारण त्यांना माहिती आहे नाईकसाहेब आलेले आहेत.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त साो.) :-**

कामगारांच्यावर कारवाई करायला मी तयार आहे.

**मिलन पाटील :-**

कामगारांच्यावर कारवाई करायला नाही. फक्त सॅनेटरी इन्स्पेक्टर आणि आपल्या मुकादमवर कारवाईबद्दल बोलतो.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त साो.) :-**

मी कारवाई करायला तुमच्या अगोदर तयार आहे.

**मिलन पाटील :-**

कामगारांबद्दल कारवाई करण्याचे मी बोलत नाही. ते गरीब आहेत. कामगारांचे काय आहे? तुम्ही त्यांना सकाळी कामाला लावले तर ते आठ-साडे आठला येतात. आपले लोक दहा वाजता येतात. कामगार साडेसातला कामाला लागतात. तेव्हा आपले सॅनेटरी इन्स्पेक्टर असतात का? आपले मुकादम साडे नऊ वाजता येतात. सात वाजता कामगार येऊन त्यांचा अर्धा दिवस भरुन जातो.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त साो.) :-**

आता टेन्डर मंजुरीच्या वेळेला आपण त्यांना आदेश दिला की, प्रत्येक सॅनेटरी इन्स्पेक्टरने कौन्सिलरची सही आणायची आणि काही लोकांनी मुकादमाची सही आणायची. असे आदेश दिल्यानंतरही परत चर्चा म्हणजे आम्ही काय उत्तर देणार?

**मिलन पाटील :-**

त्या टेन्डरमध्ये एक अट घालायची की, आपण गटार साफ करतो. ती नाही. जो खाली तळीया असतो. तो साफ झाला पाहिजे. या तळीयाची कोण साफसफाई करत नाही. तो तळीया निघायला पाहिजे ही अट त्याच्यामध्ये घालायची. तो जर तळीया साफ झालेला असेल तरच ती सफाई झालेली आहे.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त साो.) :-**

तो गाळ काढायला पाहिजे.

**मिलन पाटील :-**

लेखी आदेश आहेत. त्या अटीशर्तीमध्ये असे टाका की, तळीया निघायला पाहिजे.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, आपण नक्की अटीशर्ती काय बनवणार आहोत. याची जरा सभागृहाला माहिती द्यावी.

**मा. सभापती :-**

ज्याचा ठेका आहे तो शंभर, सव्वाशे की एकशे पस्तीस देईल ते तो ठेकेदार बघणार आहे.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त साो.) :-**

आपल्याला माहिती आहे. आपण डबर खरेदी केल्यानंतर रॉयल्टी भरली की नाही. ती ठेकेदारावर कारवाई होईल. आपल्याला डबर मिळाली ना. रॉयल्टी भरली की नाही मी कशाला बघायचे?

**जोजफ घोन्सालवीस :-**

मी तसे सांगत नाही. त्या कामगाराला किती द्यायला पाहिजे ते सांगतो.

**मा. सभापती :-**

आज मनुष्य साठ सत्तर रुपयामध्ये यायला तयार आहे. त्याला आपण काय करणार आहे? ठेकेदार माणसे घेईल.

**जोजफ घोन्सालवीस :-**

तसे पाच रुपयात पण येतील. मी तसे सांगत नाही.

**मा. सभापती :-**

जी येणारी माणसे आहेत. ती ठेकेदाराकडे त्यांच्या मताने यायला पाहिजे की, मला एवढा पगार मिळेल तरच मी काम करायला तयार आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

म्हणजे त्यांना कायदेशीरदृष्ट्या पगार द्यायला पाहिजे.

**प्रभात पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, ज्या आरोग्य विभागाच्या इथे निविदा आलेल्या आहेत. त्याच्यावर इथे बरीचशी चर्चा होते. या संदर्भात मी एवढेच बोलु इच्छिते की, ज्या सर्व नगरसेवकांच्या आरोग्याच्या तक्रारी आहेत. हे प्रशासनावर आरोप, प्रत्यारोप काहीही असेल परंतु या शहराशी निगडीत आहेत. या शहराच्या स्वच्छतेशी आणि आरोग्याशी निगडीत असलेल्या ज्या तक्रारी आहेत. त्याच्यावर आपले पुर्णतः नियंत्रण असणे हे आपण ध्यान्यात घ्यावे. ह्याच्यामागची भावना ध्यान्यात घ्यावी. त्याचबरोबर या शहराचा कचरा गाळ उपसणाऱ्या कोणीही सफाई कामगारावर अन्याय होता कामा नये. जरी आपला तो कर्तव्याचा भाग नसल किंवा आपल्या प्रशासनाचा भाग नसेल तर मी एक माणुसकीचा दृष्टीकोन ठेवुन आपले त्याच्याकडे लक्ष असणे आवश्यक आहे. हा सुद्धा भाग ध्यान्यात घेऊन आम्ही या निविदांना मंजुरी देत आहे.

**अशोक पाटील :-**

मंजुरी देण्यापुर्वी आपली चर्चा सुरु आहे. आता बऱ्याच तक्रारी या ठेकेदाराच्याबाबतीत असतात की, जो या प्रभागामध्ये आपण मंजुर पुरवठा मान्य करुन घेतो. या प्रभागात अमुक मंजुर, अमुक वाहने आणि ती रेग्युलर पुरविली जात नाहीत. मजुरदेखील जेवढी संख्या असते. तेवढा मजुर पुरवठा होत नाही आणि आम्ही जर तसे वारंवार निदर्शनास आणले तर आपण त्याच्यावर काय कारवाई करणार?

**मा. सभापती :-**

त्याच्यावर दंडाची आकारणी करु या.

**अशोक पाटील :-**

त्याच्यावर दंडाची आकारणी होणार. जेवढी वाहने त्यांनी पुरवठा करायला पाहिजे. ती जर वेळच्या वेळी आली नाहीत आणि आम्ही एवढी तक्रार केली. त्याच्यावर दंडाची कारवाई करणार.

**मा. सभापती :-**

सतत त्याची वारंवार तक्रार आली तर त्याचे नाव ब्लॅक लिस्टमध्ये द्या. किंवा त्या ठेकेदाराला काढुन टाकु.

**अशोक पाटील :-**

त्या अटी शर्तीमध्ये तसे नमुद करा अशी आमची मागणी आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, मागच्या वेळी दोन कॉन्ट्रॅक्टरबद्दल तक्रार झाली. त्यांचे नाव राज कन्स्ट्रक्शन आणि गुडलक कन्स्ट्रक्शन आहे. त्यामध्ये आपण राज कन्स्ट्रक्शनला ठेका दिला नाही. मग गुडलक कन्स्ट्रक्शनला काय सॅनेटरी इन्स्पेक्टरला गुडलक दिली म्हणुन ठेका दिला की काय?

**मिलन पाटील :-**

सभापतीसाहेब, राज कन्स्ट्रक्शन याने दुसऱ्या नावाने टेन्डर भरुन ते काम घेतलेले आहे असे माझ्या ऐकण्यात आलेले आहे. हे खरे आहे की खोटे आहे? त्याची माहिती मिळायला पाहिजे.

**रिटा शाह :-**

साहेब, जर असे चालले असेल तर इथे बसून फायदा काय?

**मा. सभापती :-**

आता कोणीही कुठल्याही नावाने टेन्डर भरु शकतो. ती व्यक्ती कोण असेल ती कल्पना नसु शकते.

**रिटा शाह :-**

पण त्या माणसाने त्याच नावाने भरले आणि त्याला ठेका दिलेला आहे.

**मा. सभापती :-**

मी राजवाल्यांचे सांगतो.

**रिटा शाह :-**

पण गुडलकवाल्यांनी गुडलक दिलेले काय?

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त सो.) :-**

कोणी कोणाच्याही नावाने टेन्डर भरतो. बायको, मुलगा वगैरेच्या नावाने देखील भरतो. मग याला काय अर्थ आहे.

**गजानन भोईर :-**

जर एखादा माणुस कामच करत नाही. मग त्याला दुसऱ्याचे नावाने देण्यात काय अर्थ आहे?

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त साो.) :-**

दुसऱ्याच्या नावावर केले असले आणि आम्हाला माहिती असले तरी रिजेक्ट करता येणार नाही. तुम्ही त्यांच्या नावावर टेन्डर भरले म्हणुन त्यांचेच टेन्डर आहे. याचा काहीही पुरावा नसतो. त्यामुळे ते रिजेक्ट करता येणार नाही.

**गजानन भोईर :-**

आयुक्त साहेब, आम्ही असे म्हणतों की, तो ब्लॅक लिस्टमध्ये टाका सांगितले होते. पण राज कन्स्ट्रक्शन बाजुला गेला. त्याने गुडलकया नावाने टाकला असेल.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त साो.) :-**

आपल्याला आता कसे म्हणता येईल की, त्यांनी त्यांच्या नावावर टाकले असेल हे अंदाज बांधुन किंवा ते खरे असेल तरी ते रिजेक्ट करता येणार नाही.

**गजानन भोईर :-**

अंदाज नाही. खरे असेल तर तुम्ही काय कारवाई करणार? असे आम्ही विचारतो.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त साो.) :-**

असे करता येणार नाही. कारण दुसऱ्यांच्या नावावर ठेका आहे.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, ह्या एकंदरीत निविदांची आपण आर्थिक, प्रशासकीय मंजुरी ज्यावेळी महासभेत घेतली होती. तेव्हा एकंदरीत ६ करोड ९६ लाख २१ हजार ४४७ एवढ्या अमाऊंटला आपण मंजुरी दिली होती. आता आपण ज्या निविदा ५ टक्के किंवा ४.७ टक्के जास्त दराने मंजुर करीत आहोत. टेंडर हे सेटींग वाटते. हे जवळजवळ ७ करोड ७३ लाख अमाऊन्ट होते. हे वाढीव निविदा आपण ज्या ५ टक्के जास्त दराने किंवा ४ टक्के जास्त दराने घेतलेल्या आहेत.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त साो.) :-**

इथे सेटिंगचा संबंध येणार नाही. ओपन टेन्डर मागविलेले आहेत. टेन्डर मागविताना तुम्ही प्रशासकीय मंजुरी दिल्यानंतर टेन्डर प्रसिद्ध झालेले आहे आणि एका टेन्डरमध्ये चार-चार, पाच-पाच टेन्डर आलेले आहेत आणि ते आल्यानंतर जे दर आलेले आहेत. त्यातुनही आरोग्य विभागाने कमी करुन घेतलेले आहेत आणि ते दर तुम्हाला योग्य नसतील तर अमान्य करा. फेर टेन्डर काढु. पण असा सेटिंगसारखा शब्द वापरुन काय उपयोग आहे का? तुम्ही म्हणा फेर टेन्डर काढा. आम्ही फेर टेन्डर उद्या प्रसिद्ध करु.

**अशोक पाटील :-**

साहेब, तसाच प्रकार झालेला आहे.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त साो.) :-**

खात्रीशीर तुम्हाला माहिती असेल तर अमान्य करा. फेर टेन्डर काढु. सेटिंग वगैरेचा इथे प्रश्न येतो कुठे? तुम्ही मंजुर करा किंवा मंजुर करु नका. तुमच्यासमोर काय कागद आले ते मंजुर करायचे किंवा नामंजुर करायचे की फेर टेन्डर काढायचे हे तुम्ही ठरवायला मी तुमच्याकडे ठेवलेले आहे.

**अशोक पाटील :-**

आयुक्तसाहेब, तुमचे म्हणणे बरोबर आहे. पण महासभेने मंजुरी दिलेली आहे.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त साो.) :-**

आपण आता असा अंदाज केला की, इतकी माणसे जेवायला येतील. त्यावेळेला इतके तांदुळ खरेदी करायचे, इतके हे खरेदी करायचे असे ठरते. प्रत्यक्षात १० टक्के कमी-जास्त होते. आता ६ लाख ४३ हजाराचे टेन्डर मागवल्यानंतर ७.७३ लाख वाढीव झाले. ते तुम्हाला महासभेपुढे रिॲप्रॉप्रिएशन करावे लागेल. पण आता बजेटमध्ये प्रोव्हिजन असताना टेन्डर मंजुर झाले आणि जर पेमेन्ट करताना कमी पडले. पेमेन्ट ६ लाख ७३ हजार पर्यंत आपण पोहोचलो, की कमी पडले तर महासभेने किंवा स्थायी समितीने रिॲप्रॉप्रिएशन केल्याशिवाय तुम्ही पेमेन्ट करायचा नाही. बजेट प्रोव्हिजनमध्ये जर बजेटची रक्कम कमी पडली तर रिॲप्रॉप्रिएशन करावे लागते.

**रिटा शाह :-**

आपण बोलले ते मला सर्व मान्य आहे. तुम्ही कायदेशीर बोलतात. माझा असा कायदेशीर प्रश्न आहे की, आमच्याकडे ती टिपणी कमिशनरसाहेबांनी पाठविलेली होती. आरोग्य विभागाने सर्व खात्याचा सर्व बाबींचा खर्च अंदाजित करुन तो सहा करोडचा बजेट आमच्याकडे आणला होता. आणि आता

तुमचा बजेट आणि अंदाज दोन महिन्यात कसा कोसळला. म्हणजे एक करोडचा. साहेब, पाहुणे आले तर एक-दोन घास वाढतो. पण एक करोडचा याच्यामध्ये फरक येतो. साहेब, ही जवाब द्यायची तुमची कुठली पद्धत आहे.

**अशोक पाटील :-**

ह्याच्यामध्ये कामगार वाढले नाहीत, वाहने वाढली नाहीत. त्यांचे रेट वाढले नाहीत.

**मा. सभापती :-**

पण माणसे वाढीव झाली.

**अशोक पाटील :-**

आयुक्तसाहेबांनी मान्य केले नाही.

**मोहन पाटील :-**

ते सात कोटी बोलतात ना. तर अमाऊन्ट वाढली काय बघा ना.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त सो.) :-**

पुर्वी रु. ८० पगार धरला होता. तो आता रु. १२५ धरुन टेन्डर काढले.

**रिटा शाह :-**

ते महासभेत झाले. महासभेत साहेबांनी तेच उत्तर दिलेले होते. चार करोडचे सहा करोड झाले वाढले म्हणुन.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त सो.) :-**

यामध्ये वॉर्डामध्ये ट्रक वाढविले. पूर्वी कमी ट्रक होते. आता २० ट्रक जादा घेतले. दोन झोन वाढले. कामगारांची संख्या वाढली. पूर्वी जे कामगार होते. त्यामध्ये वाढीव कामगार गेले आणि एक झोन वाढला आणि त्यामधील २७ ट्रक वाढवले. म्हणजे २७ ट्रक वाढीव, कामगार वाढीव आणि रु. ८० ऐवजी रु. १२५/- धरुन केले. त्यामुळे जे आलेले टेन्डर आहे. आणि आता कामगार आयुक्तांनी त्यांच्यावर काहीतरी बंधन घातले आहे असे वाटते की, तुम्ही मिनिमम पेमेन्ट केले नाही तर तुमचे रजिस्ट्रेशन कॅन्सल करु. त्यामुळे आलेले टेन्डर हे वाढीव आले. कारण टेन्डर प्रसिद्ध करताना का होईना तुम्ही रु. १२५ घालायला पाहिजे हे कामगार आयुक्तांनी कम्प्लसरी केले. म्हणुन आपण पूर्वी रु. ८० धरुन करत होतो. ते रु. १२५/- धरुन केले.

**अशोक पाटील :-**

साहेब, त्याला महासभेत मंजुरी झाली.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त सो.) :-**

साहेब, त्यांनतर २७ ट्रक आणि कामगार वाढवले. त्याच्यापेक्षा २७ ट्रक जादा घ्यायचे. एक झोन वाढविला आणि कामगारांची संख्या वाढविली. त्यामुळे अमाऊन्ट चेंज झाली.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, ही गोष्ट मी महासभेत उठविली होती की, चार करोडचे सहा करोड कसे झाले? सर्व नगरसेवक बोलतात की, माझे वर्कर कमी केले. तुम्ही वर्कर कमी केले आणि तुमचे बजेट कसे वाढले. तेव्हा शिंदे साहेबांनी क्लेरिफिकेशन दिले होते. चार करोडचे सहा करोड. लेबर इक्विपमेन्ट, गाड्या वाढवल्या. हे वाढवले म्हणुन सहा करोड झाले. आता सहा करोडचे ७ करोड ७३ लाख झाले तरी आपण म्हणता हे वाढविले. ते वाढविले. म्हणजे त्याच्यानंतर त्यांचा अंदाज कोसळला.

**मोहन पाटील :-**

एग्झॅक्ट किती असेल ती फिगर द्या ना. आपण सर्व साहित्य बघुनच केलेले आहे. चार कोटीचे सहा कोटी केले. जरी फरक पडला असेल तरी वाढले की नाही ते बघा.

**अशोक पाटील :-**

पाच टक्के दराने पकडले तर त्याच्यामध्ये सिमेन्टचे भाव वाढणार आहेत की मटेरियलचे भाव वाढणार आहेत. का कामगारांचा पगार वाढणार आहे.

**रिटा शाह :-**

आम्ही कोणावर इलीगेशन लावत नाही. फक्त १ करोड ७३ लाख कसे वाढले? फेर टेन्डर काढा.

**अशोक पाटील :-**

वाढीव पाच टक्के कशासाठी घेतले?

**नितीन ठाकुर :-**

सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, आयुक्त साहेब बोलले की, ५० रु. ने कामगार आमच्याकडे काम करण्याकरीता तयार आहेत.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त साो.) :-**

ते बाजारातील रेट सांगितले. ते मंजुरीसाठी नाही. कामगार आहेत असे जे सभापती साहेबांनी शब्द वापरले.

**नितीन ठाकुर :-**

रु. ५० प्रमाणे कामगार काम करायला तयार आहेत. असे सभापतीसाहेब बोललेले आहेत.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त साो.) :-**

कामगार तयार आहेत. परंतु, आम्ही घेऊ शकत नाही.

**नितीन ठाकुर :-**

साहेब, पण ठेकेदार रु. ५० ने कामगार घेणार की नाही. ठेकेदारांना वाढीव देऊ नका.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त साो.) :-**

ते एस्टीमेट कॉस्टला धरता येत नाही. कारण मिनिमम वेजेस ॲक्टप्रमाणे १२५ रु. ३३ पैसे धरुनच टेन्डर काढायला पाहिजे.

**रिटा शाह :-**

आपण आमच्यासमोर आरोग्य विभागाच्या दोन निविदा सादर केलेल्या आहेत. त्याच्यामध्ये नगरसेवकांचे उद्‌भवलेले प्रश्न आणि जे बजेटचे डिफरन्स येते. त्याचा संपुर्ण गोषवारा पुढच्या ह्याच्यामध्ये दऊन या विषयावर सन्मा. सदस्या प्रभात पाटील यांनी ठराव मांडलेला आहे. त्याला मी अनुमोदन देत आहे.

**केशव घरत :-**

सभापती महोदय, आता आयुक्त साहेबांनी सांगितले की, २७ ट्रक वाढविले. आपल्या महापालिकेचे किती ट्रक आहेत?

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त साो.) :-**

महापालिकेचे जवळजवळ १८ ट्रक आहेत.

**केशव घरत :-**

नवीन गेल्या वर्षी घेतलेले ट्रक किती?

**मिलन पाटील :-**

जुने रिपेअरिंगला उभे असतात.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

नवीन दहा ट्रक आहेत. आपण ते ठेकेदारांकडे देतो आणि दर दिवसाला रु. १,४००/- प्रमाणेच त्यांच्याकडे वसुल करतो.

**केशव घरत :-**

म्हणजे ठेकेदाराकडुन त्यांचे पैसे वसुल केले जातात.

**मिलन पाटील :-**

आपण रु. १,४००/- घेतो आणि डिझेल कोणाचे?

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त साो.) :-**

त्यांचेच डिझेल असते.

**मिलन पाटील :-**

आपल्या खात्यावर डिझेल भरले जाते.

**मा. सभापती :-**

आपल्या गाड्या आपल्या कामासाठी चालतात.

**केशव घरत :-**

आपल्या गाड्या कचऱ्यावर चालतात.

**मिलन पाटील :-**

साहेब, ही चुकीची माहिती आहे. कांबळेना आम्हाला सांगू द्या. आपण गाड्या वापरतो त्यात डिझेल कॉन्ट्रेक्टर भरतो की आपली महापालिका भरते. याची माहीती कांबळे यांनी द्यावी. सभापतीसाहेब, त्यांना विचारा की आपण रु. १,४००/- देतो आणि आपण त्याच्यामध्ये डिझेल किती टाकतो? रु. १,४००/- टाकतो की, दिवसाला १०० लीटर डिझेल वापरतो.

**राजकुमार कांबळे :-**

महापालिकेचे जे ट्रक आहेत. प्रतिदिन रु. १,४५५/- ठेकेदाराकडुन घेतो. त्या रु. १,४५५/- मध्ये आपले डिझेल असते.

**मिलन पाटील :-**

आपण दिवसाचे डिझेल चेक केले का? रु. १,४००/- मध्ये आपण किती डिझेल वापरतो याचा तुम्ही अंदाज घेतला का? तुम्हाला उत्तर देता येते का? रु. १४०० देतो आणि रु. २८ चे डिझेल वापरायचे. आयुक्त साहेब ऐकले का? तुम्ही देऊ नका. तुम्ही यांना गोंजारु नका. यांना विचारा आपण महापालिकेकडुन रु. १,४५५/- घेतो.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त सो.) :-**

यापुढे महापालिकेने डिझेल देऊ नये आणि रु. १,४५५/- मध्ये जी डिझेलची किंमत आहे. तेवढी कट करावी. कारण उद्या आमच्या ट्रकमध्ये डिझेल भरुन त्यांच्या ट्रकमध्ये जाणार नाही हे कशावरुन?

**मिलन पाटील :-**

साहेब, हेच चाललेले आहे.

**शिवमूर्ती नाईक (मा. आयुक्त सो.) :-**

त्यामुळे यापुढे महापालिकेने डिझेल न घेता रु. १,४५५/- मधून डिझेलची किंमत मायनस करुनच भाड्याने द्यावी आणि त्यांनी त्यांचे डिझेल भरावे.

**मा. सभापती :-**

एका दिवसात रु. १,४५५/- कापुन घ्यावे. डिझेल त्यांचे त्यांनी भरावे.

**मिलन पाटील :-**

डिझेलचे त्यांचे त्यांनी बघायचे असा ठराव करा. आपले डिझेल लागणार नाही. आपल्याला रु. १,४००/- फिक्स मिळाले पाहिजेत.

**मा. सभापती :-**

सदर ठराव मंजुर झाला आहे. औषध खरेदी (आरोग्य विभाग) अवलोकनाचा विषय पुढील सभेत ठेवण्यांत यावा.

**प्रकरण क्र. ९२ :-**

निविदांना मंजुरी देणेबाबत. (आरोग्य विभाग)

(दि.२१/०८/२००४ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ८८)

**ठराव क्र. १०१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये खाजगी करणामार्फत सार्वजनीक गट निहाय साफसफाई करणे कामाच्या निविदा नोटीस दै. सकाळ, दै. सुरज प्रकाश या वृत्तपत्रात दि. ७/८/२००४ रोजी प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामाचे १०४ निविदा फॉर्म विक्री करण्यात आले होते. त्यापैकी खालील निविदा दि. १७/८/२००४ रोजी प्राप्त झाल्या आहेत. गट क्र. १ ते १४ करीता निविदाकारांनी सादर केलेले दर हे सरासरी ७ ते ७.३० टक्के जास्त दराने असल्याने मा. आयुक्त यांनी संबंधित कमी दराच्या निविदाकारांना वाटाघाटी करण्यासाठी आदेश दिले त्याप्रमाणे वाटाधाटी केली असता खालीलप्रमाणे दर कमी करून काम करण्यास मान्य केले आहे व तसे त्यांनी लेखी पत्राने कळविले आहे.

तरी त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| गट क्रमांक | प्रभाग क्र. | अंदाजीत रक्कम | | निविदाकाराचे नाव | निविदाकाराने वाटाघाटी नंतर सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | १, २ | रु. ५२,३८,९४७/- | १ | मे. राजश्री एन्टरप्रायजेस | ४.९० टक्के जास्त दराने |
| | | | २ | मे. स्टार कंन्स्ट्रक्शन | १२.३५ टक्के जास्त दराने |
| | | | ३ | मे. गुडलक कंन्स्ट्रक्शन | १० टक्के जास्त दराने |
| २ | १८,१९ | रु. ३८,०७,३३६/- | १ | मे. राजश्री एन्टरप्रायजेस | १२.४० टक्के जास्त दराने |
| | | | २ | मे. स्टार कंन्स्ट्रक्शन | ४.७० टक्के जास्त दराने |
| | | | ३ | मे. गुडलक कंन्स्ट्रक्शन | ७.६५ टक्के जास्त दराने |
| ३ | ५,२१ | रु. १९,२६,५७३/- | १ | मे. राजश्री एन्टरप्रायजेस | १२ टक्के जास्त दराने |
| | | | २ | मे. स्टार कंन्स्ट्रक्शन | ११.१० टक्के जास्त दराने |
| | | | ३ | मे. गुडलक कंन्स्ट्रक्शन | ४.८० टक्के जास्त दराने |

| गट क्रमांक | प्रभाग क्र. | अंदाजीत रक्कम | | निविदाकाराचे नाव | निविदाकाराने वाटाघाटी नंतर सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| ४ | २६,१६,१७ | रु. ६०,५८,८५२/- | १ | मे. राजश्री एन्टरप्रायजेस | १० टक्के जास्त दराने |
| | | | २ | मे. स्टार कंन्स्ट्रक्शन | १३.४० टक्के जास्त दराने |
| | | | ३ | मे. गुडलक कंन्स्ट्रक्शन | ४.६० टक्के जास्त दराने |
| ५ | २०,३,४ | रु. ६८,९३,७७३/- | १ | में. स्टार कंन्स्ट्रक्शन | ११ टक्के जास्त दराने |
| | | | २ | मे. गुडलक कंन्स्ट्रक्शन | १० टक्के जास्त दराने |
| | | | ३ | मे. श्री साई गणेश कंन्स्ट्रक्शन | ५.२० टक्के जास्त दराने |
| ६ | ६ | रु. ४१,१३,००४/- | १ | मे. गुडलक कंन्स्ट्रक्शन | ११ टक्के जास्त दराने |
| | | | २ | मे. ॲपेक्स इंजिनिअरिंग कार्पोरेशन | ५.२५ टक्के जास्त दराने |
| | | | ३ | मे. शिवम एन्टरप्रायजेस | तांत्रिक लिफाफ्यात आवश्यक कागद पत्र नसल्याने दराचा लिफाफा उघडला नाही. |
| ७ | ८ | रु. ३४,०१,४२७/- | १ | मे. राजश्री एन्टरप्रायजेस | ९.५० टक्के जासत दराने |
| | | | २ | मे. स्टार कंन्स्ट्रक्शन | ५.१० टक्के जास्त दराने |
| | | | ३ | मे. गुडलक कंन्स्ट्रक्शन | ८.४० टक्के जास्त दराने |
| | | | ४ | मे. शिवम एन्टरप्रायजेस | तांत्रिक लिफाफ्यात आवश्यक कागद पत्र नसल्याने दराचा लिफाफा उघडला नाही. |
| ८ | ७,२४ | रु. ४१,०४,२१८/- | १ | मे. श्री साई गणेश कंन्स्ट्रक्शन | २९ टक्के जास्त दराने |
| | | | २ | मे. ॲपेक्स इंजिनिअरिंग कार्पोरेशन | तांत्रिक लिफाफ्यात आवश्यक कागद पत्र नसल्याने दराचा लिफाफा उघडला नाही. |
| | | | ३ | मे. ए वन कंन्स्ट्रक्शन | ५.२५ टक्के जास्त दराने |
| ९ | २२, २३ | रु. ५३,५९,३३८/- | १ | मे. श्री साई गणेश कंन्स्ट्रक्शन | १२ टक्के जास्त दराने |
| | | | २ | में. गुरुजी सॅनिटेशन | ५.२५ टक्के जास्त दराने |
| | | | ३ | मे. राज कंन्स्ट्रक्शन | ११ टक्के जास्त दराने |
| | | | ४ | मे. गुरुजी कंन्स्ट्रक्शन | १० टक्के जास्त दराने |
| १० | ९,२५ | रु. ५३,३५,९११/- | १ | मे. राज कंन्स्ट्रक्शन | १५ टक्के जास्त दराने |
| | | | २ | मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन | १५ टक्के जास्त दराने |
| | | | ३ | में. संकल्प ट्रेडींग | ५.२० टक्के जास्त दराने |
| ११ | १५ | रु. ६८,९८,७९०/- | १ | मे. गुरुजी सॅनिटेशन | १२ टक्के जास्त दराने |
| | | | २ | में. गुरुजी कंन्स्ट्रक्शन | ४.९० टक्के जास्त दराने |
| | | | ३ | मे आशापुरा कंन्स्ट्रक्शन | ११.५० टक्के जास्त दराने |
| | | | ४ | मे. राज कंन्स्ट्रक्शन | तांत्रिक लिफाफ्यात आवश्यक कागद पत्र नसल्याने दराचा लिफाफा उघडला नाही. |
| १२ | १४ | रु. ७९,५०,८६६/- | १ | मे. गुडलक कंन्स्ट्रक्शन | ७.८० टक्के जास्त दराने |
| | | | २ | मे. गुरजी कंन्स्ट्रक्शन | ७.९० टक्के जास्त दराने |
| | | | ३ | मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन | ४.९५ टक्के जास्त दराने |

| गट क्रमांक | प्रभाग क्र. | अंदाजीत रक्कम | | निविदाकाराचे नाव | निविदाकाराने वाटाघाटी नंतर सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| १३ | १०,११ | रु. ३७,३०,२१५/- | १ | मे. गुडलक कंन्स्ट्रक्शन | १०.२५ टक्के जास्त दराने |
| | | | २ | मे. गुरजी कंन्स्ट्रक्शन | ९.२० टक्के जास्त दराने |
| | | | ३ | मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन | ५.२० टक्के जास्त दराने |
| १४ | १२,१३ | रु. ७०,४४,७२६/- | १ | मे. गुडलक कंन्स्ट्रक्शन | ८.९० टक्के जास्त दराने |
| | | | २ | मे. गुरजी कंन्स्ट्रक्शन | १० टक्के जास्त दराने |
| | | | ३ | मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन | ४.९५ टक्के जास्त दराने |

तरी वाटाघाटी करुन आलेले दरास ही सभा आर्थिक व वित्तीय मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. प्रभात पाटील.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ०४.१५ वा.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**